ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## शैक्षणिक सेवा विभाग

## बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रम (G29) : माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2017–2018**

# बी. ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रम : माहितीपुस्तिका (G 29)

*अनुक्रमणिका*

**१. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय ........ ३**

ध्येय

**२. शिक्षणक्रमाविषयी ........ ३**

२.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे/वैशिष्ट्ये

२.२ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

२.३ शिक्षणक्रमाचा परिचय

२.४ बी.ए. (ग्राहक सेवा) प्रथम वर्ष संरचना

२.५ बी.ए. (ग्राहक सेवा) द्वितीय वर्ष संचरना

२.६ बी.ए. (ग्राहक सेवा) तृतीय वर्ष संरचना

**३. कालावधी ........ १३**

**४. माध्यम ........ १३**

**५. श्रेयांक ........ १३**

**६. मूल्यमापन प्रक्रिया (प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष) ........ १४**

**७. अभ्यासकेंद्रे ........ १४**

**८. विभागीय केंद्रे ........ १५**

**९. विशेष सूचना ........ १५**

**१०. संपर्कासाठी ........ १६**

# १. शैक्षणिक सेवा विभागाचा परिचय

## ध्येय

शैक्षणिक सेवा विभाग (Academic Services Division) हा विद्यापीठातील एक महत्त्वाचा शैक्षणिक विभाग आहे. या विभागातर्फे मुख्यत: पदव्युत्तर स्तरावरील शिक्षणक्रमांची अंमलबजावणी केली जाते. त्याचप्रमाणे, काही प्रमाणपत्र आणि पदविका स्तरांवरील शिक्षणक्रमदेखील या विभागातर्फे उपलब्ध आहेत.

शैक्षणिक सेवा विभागातर्फे उपलब्ध असलेल्या शिक्षणक्रमांची सूची:

- एम. ए. विषय संप्रेषण
- एम. ए. शैक्षणिक संप्रेषण
- एम. ए. दूरशिक्षण
- एम. एस्सी. विषय संप्रेषण
- संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम
- गांधी विचार दर्शन पदविका
- मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम
- बी.ए. (ग्राहक सेवा)

'बी.ए. (ग्राहक सेवा)' हा शिक्षणक्रम विशिष्ट लक्ष्यगटांसाठी सुरू करण्यात आलेला आहे. त्याच्या अंमलबजावणीचे कामदेखील शैक्षणिक सेवा विभागामार्फत केले जात आहे. 'बी.ए. (ग्राहक सेवा)' हा शिक्षणक्रम मुख्यत: ग्राहक सेवेशी थेट संबंधित व्यक्तींना खूप उपयुक्त आहे. या शिक्षणक्रमाच्या माध्यमातून शिक्षण खंडित झालेल्या व्यक्तींना शिकण्याची पुन्हा एक संधी उपलब्ध करून देणे हा विद्यापीठाचा त्यामागील उद्देश आहे. प्रस्तुत शिक्षणक्रम प्रत्यक्ष ग्राहकसेवा क्षेत्राशी संबंधित विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरू शकतो. उदाहरणार्थ, किरकोळ व्यापार, मॉल्स वगैरे ठिकाणी सेल्समन/सेल्सवुमन म्हणून कार्यरत असलेल्यांनाही तसेच प्रत्यक्ष ग्राहकाशी संबंधित व्यवसायातील नोकरदारांनाही हा शिक्षणक्रम उपयुक्त ठरेल.

पदवीधर होण्याची इच्छा बाळगणाऱ्या गृहिणी तसेच शासकीय, निमशासकीय क्षेत्रातील नोकरदारांना घरकाम-नोकरी-व्यवसाय सांभाळून पदवीधर होण्याची ही उत्तम संधी आहे.

विद्यापीठाची ही भूमिका प्रत्यक्षात आणताना शैक्षणिक सेवा विभागास त्याचा निश्चितच आनंद आहे.

# २. शिक्षणक्रमाविषयी

'बी.ए. (ग्राहक सेवा)' हा शिक्षणक्रम मुख्यत: विशिष्ट लक्ष्यगटांसाठी विकसित करण्यात आला आहे. अनेकदा, वैयक्तिक अथवा कौटुंबिक अडचणींमुळे काही व्यक्तींना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. शिकण्याची इच्छा असूनदेखील उर्वरित शिक्षण घेणे शक्य होत नाही. अशा व्यक्तींना शिक्षणाची 'दुसरी संधी' मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. या शिक्षणक्रमाद्वारे गरजू व्यक्तींना अपुरे राहिलेले शिक्षण पूर्ण करता येईल. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन कामामध्ये अधिक परिणामकारक बदल होतीलच; मात्र त्याचबरोबर पदवीधर होण्याचा आनंददेखील मिळेल. त्यादृष्टीने या शिक्षणक्रमामधील अभ्यासक्रम (पेपर्स) विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात उपयोगी पडावेत अशा प्रकारे तयार करण्यात आले आहेत. भाषा, सामाजिकशास्त्रे, विज्ञान-तंत्रज्ञान, जीवन कौशल्ये, वाणिज्य तसेच व्यवस्थापन विद्याशाखांमधील निवडक अभ्यासक्रमांचा समावेश या शिक्षणक्रमामध्ये केला आहे. त्यामुळे या शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यास सर्वांगीण ज्ञान मिळण्यास मदत होईल, अशी विद्यापीठाची भूमिका आहे.

## २.१ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे/वैशिष्ट्ये

### २.१.१ उद्दिष्टे

(i) पदवी शिक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांना शिक्षणाची 'दुसरी संधी' उपलब्ध करून देणे.

(ii) ग्राहक सेवा क्षेत्रामध्ये कार्यरत व्यक्तींच्या व्यावसायिक कौशल्यांमध्ये सुधारणा घडवून आणणे.

(iii) ग्राहक सेवा क्षेत्राशी संबंधित नवीन माहिती/ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोचविणे.

### २.१.२ वैशिष्ट्ये

(i) स्वत:ची व्यावसायिक/कौटुंबिक जबाबदारी सांभाळून शिक्षणक्रम पूर्ण करणे शक्य.

(ii) भाषा, वाणिज्य, व्यवस्थापन, सामाजिकशास्त्रे, जीवन कौशल्ये या सारख्या विविध अभ्यासक्रमांच्या समावेशामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षेमध्ये वाढ.

(iii) परिपूर्ण अध्ययन साहित्य, शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये संमंत्रणाचा आधार यासारख्या दूरशिक्षणातील घटकांचा योग्य समावेश.

(iv) वार्षिक मूल्यमापनासह अंतर्गत मूल्यमापन पद्धतीचा समावेश.

## २.२ शिक्षणक्रमाची उपयुक्तता

(i) पदवीधर झाल्यामुळे सामाजिक प्रतिष्ठेमध्ये वाढ.

(ii) पदवीधर झाल्यामुळे आत्मविश्वास आणि आत्मसन्मान यामध्ये वाढ.

(iii) जीवनोपयोगी कौशल्यांच्या ज्ञान आणि वापरामध्ये वाढ (उदा. संभाषण कौशल्ये).

(iv) व्यावसायिक ज्ञान वाढेल आणि त्याच्या वापरासाठी आवश्यक असणारा आत्मविश्वास प्राप्त होईल.

(v) शिक्षणाच्या माध्यमातून नोकरी मिळण्याची, पदोन्नतीची तसेच जोडव्यवसाय करण्याच्या शक्यतेमध्ये वाढ.

## २.३ शिक्षणक्रमाचा परिचय

'बी.ए. (ग्राहक सेवा)' हा पदवीस्तराचा शिक्षणक्रम आहे. यामध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षांच्या काळामध्ये विविध प्रकारचे अभ्यासक्रम समाविष्ट केले आहेत. ग्राहक सेवा क्षेत्रामधील ज्या व्यक्तींचे शिक्षण अर्धवट राहिले आहे अशा व्यक्तींसाठी तसेच पदवीधर होऊ इच्छिणाऱ्या सर्वसामान्यांसाठी देखील हा शिक्षणक्रम उपयुक्त आहे.

विद्यार्थ्याने प्रथम वर्षास प्रवेश घेतल्यानंतर क्रमाक्रमाने तृतीय वर्षापर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रातील अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतात. यामध्ये मूल्यमापनासाठी वार्षिक लेखी परीक्षेसह गृहपाठाद्वारे अंतर्गत मूल्यमापनाचादेखील समावेश आहे.

एकंदरीत, पुन्हा नव्याने शिक्षण घेणाऱ्यांसाठी ही एक नावीन्यपूर्ण संधी मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे.

## २.४ बी.ए. (ग्राहक सेवा) प्रथम वर्ष संरचना

### २.४.१ संरचना (वार्षिक परीक्षा पद्धत)

| *क्र.* | *अभ्यासक्रमाचे नाव व संकेतांक* | *गुण* | *श्रेयांक* | *संपर्कसत्र संख्या* |
|---|---|---|---|---|
| ०१. | अध्ययन कौशल्य शिक्षणासाठी अधिष्ठान अभ्यासक्रम (OPN 102) | १०० | ०६ | ०६ |
| ०२. | मराठी व हिंदी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम (MHN 101) | १०० | ०६ | ०६ |
| ०३. | जीवनकौशल्ये (SFT 002) | १०० | ०६ | ०६ |
| ०४. | सामान्यज्ञान, विकास व संकल्पना (GEN 102) | ५० | ०३ | ०३ |
| ०५. | इंग्रजी भाषेची मूलभूत कौशल्ये (ENG 203) | ५० | ०३ | ०३ |
| ०६. | कार्यालयीन सेवा व व्यवस्थापन (BAC 203) | १०० | ०६ | ०६ |
| ०७. | सामाजिक शास्त्रांचा परिचय (SOC 204) | १०० | ०६ | ०६ |
| | **एकूण** | **६००** | **३६** | **३६** |

अशाप्रकारे प्रथम वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) करिता एकूण ३६ श्रेयांक आणि ६०० गुण निश्चित करण्यात आले आहेत. प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांस वरील सर्व अभ्यासक्रम निवडणे आवश्यक असेल.

### २.४.२ अभ्यासक्रमनिहाय पुस्तकांचा तपशील (F.Y.B.A.)

| *क्र.* | *अभ्यासक्रमाचे नाव* | *त्यासाठी मिळणारी पुस्तके* |
|---|---|---|
| ०१. | अध्ययन कौशल्य शिक्षणासाठी अधिष्ठान अभ्यासक्रम (OPN 102) | पुस्तक ०१ : वाचन आणि लेखन कौशल्ये<br>पुस्तक ०२ : श्रवण आणि संभाषण कौशल्ये<br>पुस्तक ०३ : निरीक्षण, ग्रंथालय उपयोजन व स्वयं-निर्देशित अध्ययन |
| ०२. | मराठी व हिंदी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम (MHN 101) | मराठी व हिंदी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम |
| ०३. | जीवन कौशल्ये (SFT 002)<br><br>पुस्तक ०३ : | जीवन कौशल्ये एकत्रित<br>पुस्तक : भाग एक<br>पुस्तक ०१ : स्वत:ची ओळख<br>पुस्तक ०२ : स्वत:ला व्यक्त करताना<br>स्वत:ला सादर करताना<br>जीवन कौशल्ये एकत्रित<br>पुस्तक भाग : भाग दोन<br>पुस्तक ०४ : स्वत:चा व इतरांचा विकास<br>पुस्तक ०५ : आंतरव्यक्तिक कौशल्ये<br>पुस्तक ०६ : ताणतणाव व्यवस्थापन |
| ०४. | सामान्यज्ञान, विकास व संकल्पना (GEN 102) | पुस्तक ०१ : विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण आणि आरोग्य<br>पुस्तक ०२ : विकास: संकल्पना आणि मार्ग |
| ०५. | इंग्रजी भाषेची मूलभूत कौशल्ये (ENG 203) | Foundation Course in English<br>Foundation Course in English : Workbook |

| क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | त्यासाठी मिळणारी पुस्तके |
|---|---|---|
| ०६. | कार्यालयीन सेवा व व्यवस्थापन (BAC 203) | पुस्तक ०१ : कार्यालय : रचना व कार्यपद्धती<br>पुस्तक ०२ : कार्यालय संघटन व कर्मचारी व्यवस्थापन<br>पुस्तक ०३ : दप्तर व्यवस्थापन व जनसंपर्क |
| ०७. | सामाजिकशास्त्रांचा परिचय (SOC 204) | पुस्तक ०१ : इतिहास व राज्यशास्त्र<br>पुस्तक ०२ : समाजशास्त्र व मानसशास्त्र<br>पुस्तक ०३ : संज्ञापन क्रांती आणि जैवतंत्रज्ञान |

### २.४.३ प्रवेश पात्रता (प्रथम वर्ष बी.ए.साठी)

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता धारण करणारी व्यक्ती प्रथम वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) साठी प्रवेशास पात्र असेल.

(अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी (एच.एस.सी.) किंवा इतर राज्यांतील समकक्ष परीक्षा उत्तीर्ण

*किंवा*

(ब) य.च.म. मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम (किमान ४०% गुण) उत्तीर्ण

*किंवा*

(क) १९७५ पूर्वीची माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता ११ वी) उत्तीर्ण

### २.४.४ शिक्षणक्रम शुल्क

बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचे शुल्क रु.१५००/– (एक हजार पाचशे मात्र) आहे. त्यापैकी विद्यापीठाचा हिस्सा रु. १०००/– असून तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच अभ्यासकेंद्र हिस्सा रु. ५००/– असून अभ्यासकेंद्र हिश्श्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

**महत्त्वाचे :**
**विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरून झाल्यानंतर त्याचा प्रिंटआऊट घ्यावा. सदर प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करावा. अभ्यासकेंद्र हिस्सा (शुल्क) तसेच प्रवेश अर्जाचा प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यास या शिक्षणक्रमाचे उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य (पुस्तके) प्राप्त होऊ शकेल.**

**शुल्क परत मिळण्याबाबत :**

शिक्षणक्रमास प्रवेश घेतल्यानंतर कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द करून शुल्क परत दिले जाणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्रवेश घेण्यापूर्वी सर्व बाबींची खात्री करून घेण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असेल. पात्रता नसताना विद्यार्थाने प्रवेश घेतल्यास कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.

## २.५ बी.ए. (ग्राहक सेवा) द्वितीय वर्ष संरचना

### २.५.१ संरचना (वार्षिक परीक्षा पद्धत)

| *अ.क्र.* | *अनिवार्य अभ्यासक्रमाचे नाव व संकेतांक* | *गुण* | *श्रेयांक* | *संपर्कसत्र संख्या* |
|---|---|---|---|---|
| १. | विपणन व्यवस्थापन व विक्रय कला : भाग एक (BAC 211) | १०० | ०६ | ०६ |
| २. | विपणन व्यवस्थापन व विक्रय कला : भाग दोन (BAC 212) | १०० | ०६ | ०६ |
| ३. | प्रभावी व्यवसाय संज्ञापन (BAC 213) | १०० | ०६ | ०६ |
| ४. | व्यवसाय संघटन (BAC 214) | १०० | ०६ | ०६ |
| ५. | पर्यावरण अभ्यास (EVS 201) | १०० | ०४ | -- |

(वरील अ.क्र.१ ते ५ अभ्यासक्रम बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षासाठी अनिवार्य (Compulsory) आहेत. पर्यावरण अभ्यास या अनिवार्य विषयाचीही परीक्षा विद्यार्थ्यांना द्यावी लागेल.)

| *अ.क्र.* | *वैकल्पिक अभ्यासक्रमाचे नाव व संकेतांक* ***(खालीलपैकी एका विषयाची जोडी निवडावी)*** | *गुण* | *श्रेयांक* | *संपर्कसत्र संख्या* |
|---|---|---|---|---|
| ५(i) | आधुनिक इतिहास : भाग एक (BAC 305) | १०० | ०६ | ०६ |
| ५(ii) | आधुनिक इतिहास : भाग दोन (BAC 306) | १०० | ०६ | ०६ |
| ६(i) | भारतीय राजकारण व राज्यशास्त्र : भाग एक (BAC 307) | १०० | ०६ | ०६ |
| ६(ii) | भारतीय राजकारण व राज्यशास्त्र : भाग दोन (BAC 308) | १०० | ०६ | ०६ |
| ७(i) | भारतीय समाज व समाजशास्त्र: भाग एक (BAC 309) | १०० | ०६ | ०६ |
| ७(ii) | भारतीय समाज व समाजशास्त्र: भाग दोन (BAC 310) | १०० | ०६ | ०६ |
| ८(i) | प्रगत मराठी : भाग एक (BAC 311) | १०० | ०६ | ०६ |
| ८(ii) | प्रगत मराठी : भाग दोन (BAC 312) | १०० | ०६ | ०६ |
| ९(i) | प्रगत हिंदी : भाग एक (BAC 313) | १०० | ०६ | ०६ |
| ९(ii) | प्रगत हिंदी : भाग दोन (BAC 314) | १०० | ०६ | ०६ |
| १०(i) | प्रगत इंग्रजी : भाग एक (BAC 315) | १०० | ०६ | ०६ |
| १०(ii) | प्रगत इंग्रजी : भाग दोन (BAC 316) | १०० | ०६ | ०६ |

**वैकल्पिक अभ्यासक्रम :** ५. (BAC 305 + BAC 306)/ ६. (BAC 307 + BAC 308)/७. (BAC 309 + BAC 310)/ ८.(BAC 311 + BAC 312)/ ९. (BAC 313 + BAC 314)/ १०. (BAC 315 + BAC 316) यापैकी एक विषय जोडी निवडावी.

(**विशेष सूचना :** वर उल्लेख केलेल्या जोडीप्रमाणेच वैकल्पिक विषय निवडता येतील. जोडी तोडून विषय निवड करता येणार नाही.)

अशाप्रकारे द्वितीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य अभ्यासक्रम ४०० गुणांचे (२४ श्रेयांक) तर वैकल्पिक अभ्यासक्रम २०० गुणांचे (१२ श्रेयांक) असे मिळून एकूण ६०० गुणांचे (३६ श्रेयांक) कार्य असेल. पर्यावरण अभ्यास या अभ्यासक्रमाचे गुण शिक्षणक्रमाची अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि यात किमान 'सी' श्रेणी मिळविणे अनिवार्य असेल.

### २.५.२ अभ्यासक्रमनिहाय पुस्तकांचा तपशील

***अनिवार्य अभ्यासक्रम (Compulsory Courses)***

(१) विपणन व्यवस्थापन व विक्रय कला : भाग ०१ (BAC 211) :

पुस्तक-१ : विपणन

पुस्तक-२ : विपणन मिश्र

पुस्तक-३ : विपणन माहिती

(२) विपणन व्यवस्थापन व विक्रय कला: भाग ०२ (BAC 212) :

पुस्तक-१ : जाहिरात

पुस्तक-२ : विक्रयकला

पुस्तक-३ : ग्राहक समाधान

(३) प्रभावी व्यवसाय संज्ञापन (BAC 213) :

पुस्तक-१ : संज्ञापनाची मूलतत्त्वे व माध्यमे

पुस्तक-२ : लेखी व तोंडी संज्ञापन

पुस्तक-३ : प्रभावी संज्ञापन व मानवी संबंध

(४) व्यवसाय संघटन (BAC 214) :

पुस्तक-१ : औद्योगिक संघटन, उद्योगाचे स्थानिकीकरण व लघुउद्योग

पुस्तक-२ : उद्योग-आकार, संयोग व भांडवल

पुस्तक-३ : उद्योग संबंध व व्यवस्थापन

***वैकल्पिक अभ्यासक्रम (Optional Courses)***

(५) आधुनिक इतिहास (भाग एक आणि दोन) (BAC 305, BAC 306)

(i) पुस्तक-१ : ब्रिटिश साम्राज्यवाद आणि भारत

पुस्तक-२ : राष्ट्रीय चळवळ १८८५-१९२०

पुस्तक-३ : ब्रिटिश प्रशासनाचा इतिहास आणि घटनात्मक विकास (१८५८-१९२०)

(५) (ii) पुस्तक-१ : क्रांतिपर्व : अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन राज्यक्रांती

पुस्तक-२ : औद्योगिक क्रांती, युरोपीय राष्ट्रवाद आणि साम्राज्यवाद

पुस्तक-३ : आशिया खंडातील राष्ट्रवाद : चीन आणि जपान

(६) भारतीय राजकारण आणि राज्यशास्त्र (भाग एक आणि दोन) (BAC 307, BAC 308)

(i) पुस्तक-१ : अंतर्गत व बाह्य पर्यावरण

पुस्तक-२ : लोकशाहीची प्रक्रिया आणि राजकीय मानसिकता

पुस्तक-३ : राजकीय प्रक्रिया : संघराज्याची संस्थात्मक चौकट

(ii) पुस्तक-१ : मूलभूत हक्क, नागरिक स्वातंत्र्ये व रोजगार हक्क

पुस्तक-२ : आदिवासी, शेतमजूर आणि अल्प व अत्यल्पभूधारक : हक्क व परिपूर्ती

पुस्तक-३ : वनमजूर आणि बांधकाम मजूर : हक्क आणि परिपूर्ती

(७) भारतीय समाज आणि समाजशास्त्र (भाग एक आणि दोन) (BAC 309, BAC 310)

(i) पुस्तक-१ : सामाजिक परिवर्तन : प्रक्रिया व घटक

पुस्तक-२ : सामाजिक परिवर्तन : परिणाम व चळवळींचा स्थूल परिचय

पुस्तक-३ : सामाजिक चळवळी : अस्पृश्यता निवारण, दलित, शेतकरी व कामगार

(ii) पुस्तक-१ : समाज व्यवस्था आणि कुटुंब, विवाह व नातीगोती

पुस्तक-२ : जाती व वर्ग आणि भारतीय आदिवासी

पुस्तक-३ : भारतीय खेडी आणि अर्थ व राजकारण

(८) प्रगत मराठी (भाग एक आणि दोन) (BAC 311, BAC 312)

(i) पुस्तक-१ : कादंबरी : स्वरूप आणि रचना

पुस्तक-२ : कथा : स्वरूप आणि रचना

पुस्तक-३ : कादंबरी : आकलन आणि विश्लेषण

(ii) पुस्तक-१: नवसाहित्य आणि साहित्येतर साहित्य

पुस्तक-२ : ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य

पुस्तक-३ : निवडक वेचे

(९) प्रगत हिंदी (भाग एक आणि दोन) (BAC 313, BAC 314)

(i) पुस्तक-१ : कथन-मीमांसा

पुस्तक-२ : उपन्यास विमर्ष

पुस्तक-३ : नाटक : स्वरूप और विश्लेषण

(ii) पुस्तक–१ : जीवनीपरक साहित्य
पुस्तक–२ : वर्णनपरक साहित्य
पुस्तक–३ : वैचारिक निबंध

(१०) प्रगत इंग्रजी (भाग एक आणि दोन) (BAC315, BAC316)
(i) Book - 1 : How to Read a Short Story - Book 1
Book - 2 : How to Read a Short Story - Book 2
Book - 3 : How to Read a Short Story - Book 3
(ii) Book - 1 : How to Read a Novel

### २.५.३ प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता धारण करणारी व्यक्ती द्वितीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) साठी प्रवेशास पात्र असेल.

(अ) य.च.म. मुक्त विद्यापीठाचा प्रथम वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) उत्तीर्ण, अनुत्तीर्ण किंवा अनुपस्थित विद्यार्थी

*किंवा*

(ब) अन्य मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून 'प्रथम वर्ष बी.ए.' शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश मिळू शकेल. अशा थेट पद्धतीने द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु.३६००/– (तीन हजार सहाशे मात्र) शुल्क असेल.

### २.५.४ शिक्षणक्रम शुल्क

बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षानंतर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी :

(अ) बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षाचे शुल्क रु.२१००/– (दोन हजार शंभर मात्र) आहे. त्यापैकी विद्यापीठाचा हिस्सा रु. 1500/– असून तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच अभ्यासकेंद्र हिस्सा रु. 600/– असून अभ्यासकेंद्र हिश्श्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

(ब) अन्य विद्यापीठातून प्रथम वर्ष बी.ए. उत्तीर्ण होऊन बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शुल्क रचना :
अन्य विद्यापीठातून प्रथम वर्ष बी.ए. पूर्णपणे उत्तीर्ण करून मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु.३६००/– (तीन हजार सहाशे मात्र) शुल्क आहे. त्यापैकी विद्यापीठाचा हिस्सा रु. 3000/– असून तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच अभ्यासकेंद्र हिस्सा रु. 600/– असून अभ्यासकेंद्र हिश्श्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

**महत्त्वाचे :**
**विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरून झाल्यानंतर त्याचा प्रिंटआऊट घ्यावा. सदर प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करावा. अभ्यासकेंद्र हिस्सा (शुल्क) तसेच प्रवेश अर्जाचा प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यास या शिक्षणक्रमाचे उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य (पुस्तके) प्राप्त होऊ शकेल.**

## २.६ बी.ए. (ग्राहक सेवा) तृतीय वर्ष संरचना

### २.६.१ संरचना (वार्षिक परीक्षा पद्धत)

तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) साठी खालीलप्रमाणे विशेषस्तर (Specialization) अभ्यासक्रम गट उपलब्ध असतील. विद्यार्थ्याने त्यापैकी एक अभ्यासक्रम गट निवडून त्यातील सहा अभ्यास विषयांची परीक्षा द्यायची आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम गट : अभ्यासक्रमाचे नाव व संकेतांक | गुण | श्रेयांक | संपर्क सत्र संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | **प्रगत मराठी अध्ययन** | | | |
| | मराठी (एक) : वाङ्मय प्रकार (नाटक-कविता) (BAC 401) | १०० | ०६ | ०६ |
| | मराठी (दोन) : मध्ययुगीन वाङ्मयीन प्रवाह (BAC 402) | १०० | ०६ | ०६ |
| | मराठी (तीन) : प्रबोधनपर साहित्य (BAC 403) | १०० | ०६ | ०६ |
| | मराठी (चार) : बालसाहित्य (BAC 404) | १०० | ०६ | ०६ |
| | मराठी (पाच) : प्रसार माध्यमांसाठी लेखन कौशल्ये (BAC 405) | १०० | ०६ | ०६ |
| | मराठी (सहा) : लोकवाङ्मय (BAC 406) | १०० | ०६ | ०६ |
| ०२ | **Advanced English Study** | | | |
| | English (One) : Indian Writing in English(BAC 411) | १०० | ०६ | ०६ |
| | English (Two) : Understanding Drama (BAC 412) | १०० | ०६ | ०६ |
| | English (Three) : Understanding Prose (BAC 413) | १०० | ०६ | ०६ |
| | English (Four) : Understanding Poetry (BAC 414) | १०० | ०६ | ०६ |
| | English (Five) : Communication Skills in English (BAC 415) | १०० | ०६ | ०६ |
| | English (Six) : Structure of Modern English (BAC 416) | १०० | ०६ | ०६ |
| ०३ | **प्रगत हिंदी अध्ययन** | | | |
| | हिंदी (एक) : कविता : स्वरूप और विवेचन (BAC 421) | १०० | ०६ | ०६ |
| | हिंदी (दो) : साहित्य और समीक्षा : स्वरूप और विवेचन (BAC 422) | १०० | ०६ | ०६ |
| | हिंदी (तीन) : हिंदी में नवजागरण (BAC 423) | १०० | ०६ | ०६ |
| | हिंदी (चार) : हिंदी का भाषा वैज्ञानिक अध्ययन (BAC 424) | १०० | ०६ | ०६ |
| | हिंदी (पाच) : प्रयोजनमूलक हिंदी (BAC 425) | १०० | ०६ | ०६ |
| | हिंदी (छ:) : अनुवाद : स्वरूप और विवेचन (BAC 426) | १०० | ०६ | ०६ |
| ०४ | **प्रगत अर्थशास्त्र अध्ययन** | | | |
| | अर्थशास्त्र (एक) : भारताचा आर्थिक विकास (BAC 431) | १०० | ०६ | ०६ |
| | अर्थशास्त्र (दोन) : सार्वजनिक वित्त व्यवहार (BAC 432) | १०० | ०६ | ०६ |
| | अर्थशास्त्र (तीन) : आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र (BAC 433) | १०० | ०६ | ०६ |
| | अर्थशास्त्र (चार) : कृषी उद्योग व सेवा क्षेत्रांचे आर्थिक सिद्धांत (BAC 434) | १०० | ०६ | ०६ |
| | अर्थशास्त्र (पाच) : ग्राहक संरक्षण (BAC 435) | १०० | ०६ | ०६ |
| | अर्थशास्त्र (सहा) : ग्रामीण विकास (BAC 436) | १०० | ०६ | ०६ |
| ०५ | **प्रगत इतिहास अध्ययन** | | | |
| | इतिहास (एक) : प्राचीन भारत : प्रारंभ ते यादव काळ (BAC 441) | १०० | ०६ | ०६ |
| | इतिहास (दोन) : मध्ययुगीन भारत (इ.स. १२०६ ते १८५७) (BAC 442) | १०० | ०६ | ०६ |
| | इतिहास (तीन) : भारतीय स्त्री जीवनाची वाटचाल (BAC 443) | १०० | ०६ | ०६ |
| | इतिहास (चार) : सार्क देशांचा इतिहास (BAC 444) | १०० | ०६ | ०६ |
| | इतिहास (पाच) : विविधतेतील एकता (BAC 445) | १०० | ०६ | ०६ |
| | इतिहास (सहा) : आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (BAC 446) | १०० | ०६ | ०६ |

| अ.क्र. | अभ्यासक्रम गट : अभ्यासक्रमाचे नाव व संकेतांक | | गुण | श्रेयांक | संपर्क सत्र संख्या |
|---|---|---|---|---|---|
| ०६ | **प्रगत राज्यशास्त्र अध्ययन** | | | | |
| | राज्यशास्त्र (एक) : राज्यशास्त्राचे स्वरूप | (BAC 451) | १०० | ०६ | ०६ |
| | राज्यशास्त्र (दोन) : राजकीय संरचना | (BAC 452) | १०० | ०६ | ०६ |
| | राज्यशास्त्र (तीन) : आधुनिक भारतातील राजकीय वारसा | (BAC 453) | १०० | ०६ | ०६ |
| | राज्यशास्त्र (चार) : आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण | (BAC 454) | १०० | ०६ | ०६ |
| | राज्यशास्त्र (पाच) : पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह | (BAC 455) | १०० | ०६ | ०६ |
| | राज्यशास्त्र (सहा) : लोक प्रशासन | (BAC 456) | १०० | ०६ | ०६ |
| ०७ | **प्रगत समाजशास्त्र अध्ययन** | | | | |
| | समाजशास्त्र (एक) : पर्यावरण व समाज | (BAC 461) | १०० | ०६ | ०६ |
| | समाजशास्त्र (दोन) : ग्रामीण समाजशास्त्र | (BAC 462) | १०० | ०६ | ०६ |
| | समाजशास्त्र (तीन) : समाजशास्त्राचे अभिजात विचारवंत | (BAC 463) | १०० | ०६ | ०६ |
| | समाजशास्त्र (चार) : औद्योगिक समाजशास्त्र | (BAC 464) | १०० | ०६ | ०६ |
| | समाजशास्त्र (पाच) : लोकसंख्या शिक्षण | (BAC 465) | १०० | ०६ | ०६ |
| | समाजशास्त्र (सहा) : वयोवर्धन प्रक्रिया | (BAC 466) | १०० | ०६ | ०६ |

तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) साठी वरील प्रमाणे सात विशेषस्तर (Specialization) अभ्यासक्रम गट उपलब्ध असतील. त्यापैकी कोणत्याही एका गटातील सर्व सहा अभ्यासक्रम निवडणे आवश्यक आहे. अशा प्रकारे तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना ३६ श्रेयांकांसाठी ६०० गुण असतील. विद्यार्थ्याने निवडलेल्या विशेषस्तर अभ्यासक्रमानुसार त्याच्या पदवीचे विशेषीकरण असेल.

## २.६.२ अभ्यासक्रमनिहाय पुस्तकांचा तपशील

तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या विशेषस्तर (Specialization) अभ्यासक्रमांमधील पुस्तकांचा तपशील खाली दिला आहे.

### (१) प्रगत मराठी अध्ययन

- **वाङ्मय प्रकार (काव्य व नाटक) (BAC 401)**
  पुस्तक पहिले : कविता
  पुस्तक दुसरे : नाटक
  पुस्तक तिसरे : नाटक : आकलन आणि आस्वाद

- **मध्ययुगीन वाङ्मयीन प्रवाह (BAC 402)**
  पुस्तक पहिले : महानुभाव व संत वाङ्मय
  पुस्तक दुसरे : पंडिती, शाहिरी व बखर वाङ्मय
  पुस्तक तिसरे : मध्ययुगीन वाङ्मय प्रवाह : निवडक वेचे

- **प्रबोधनपर साहित्य (BAC 403)**
  पुस्तक पहिले : प्रबोधनपर साहित्य : स्वरूप व संकल्पना
  पुस्तक दुसरे : प्रबोधनपर वैचारिक वाङ्मय
  पुस्तक तिसरे : प्रबोधनपर ललित वाङ्मय

- **बालसाहित्य (BAC 404)**
  पुस्तक पहिले : बालसाहित्य : स्वरूप आणि वाटचाल
  पुस्तक दुसरे : बालकथा व बालकादंबरी
  पुस्तक तिसरे : बालसाहित्य : कविता, नाटक व चरित्र

- **प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये (BAC 405)**
  पुस्तक पहिले : मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये
  पुस्तक दुसरे : दृक्-श्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्ये
  पुस्तक तिसरे : लेखनाचे विविध आकृतिबंध

- **लोकवाङ्मय (BAC 406)**
  पुस्तक पहिले : लोकसाहित्य
  पुस्तक दुसरे : लोकसाहित्य व आधुनिक साहित्य
  पुस्तक तिसरे : लोकसाहित्य : संशोधन पद्धती

### (२) Advanced English Study

- **Indian Writing in English (BAC 411)**
  Book 1 : Non-Fictional Prose
  Book 2 : Indian Poetry in English
  Book 3 : Fictional Prose

- **Understanding Drama (BAC 412)**
  Book 1 : Drama : Theory and History
  Book 2 : European Drama
  Book 3 : Indian Drama

- **Understanding Prose (BAC 413)**
  Book 1 : History of English Prose
  Book 2 : Forms of Prose
  Book 3 : Close Textual Reading

- **Understanding Poetry (BAC 414)**
  Book 1 : The Romantic Poetry
  Book 2 : The Victorian Poetry
  Book 3 : The Modern Poetry

- **Communication Skills in English (BAC 415)**
  Book 1 : Communication Skills in English
  Book 2 : Communication Skills in English
  Book 3 : Communication Skills in English

- **Structure of Modern English (BAC 416)**
  Book 1 : Phonetics and Phonology of English
  Book 2 : Grammar of English Words and Phrases
  Book 3 : Sentence Grammar

## (३) प्रगत हिंदी अध्ययन

- **कविता : स्वरूप और विवेचन (BAC 421)**
  किताब पहली : कविता की अवधारणा
  किताब दूसरी : मध्ययुगीन कविता
  किताब तिसरी : आधुनिक कविता

- **साहित्य और समीक्षा : स्वरूप और विवेचन (BAC 422)**
  किताब पहली : साहित्य की अवधारणा
  किताब दूसरी : साहित्य के रूप
  किताब तिसरी : समीक्षा का स्वरूप

- **हिंदी में नवजागरण (BAC 423)**
  किताब पहली : मध्यकाल में नवजागरण
  किताब दूसरी : उन्नीसवीं सदी में नवजागरण
  किताब तिसरी : बीसवीं सदी में नवजागरण

- **हिंदी का भाषा वैज्ञानिक अध्ययन (BAC 424)**
  किताब पहली : हिंदी भाषा का परिचय
  किताब दूसरी : हिंदी भाषा का उद्‌भव और विकास
  किताब तिसरी : हिंदी भाषा की संरचना

- **प्रयोजनमूलक हिंदी (BAC 425)**
  किताब पहली : संचार–माध्यमों में हिंदी
  किताब दूसरी : कार्यालयीन और व्यावहारिक हिंदी
  किताब तिसरी : पारिभाषिक शब्दावली

- **अनुवाद : स्वरूप और विवेचन (BAC 426)**
  किताब पहली : अनुवाद की अवधारणा
  किताब दूसरी : व्यावहारिक अनुवाद
  किताब तिसरी : साहित्यिक अनुवाद

## (४) प्रगत अर्थशास्त्र अध्ययन

- **भारताचा आर्थिक विकास (BAC 431)**
  पुस्तक पहिले : भारतीय अर्थव्यवस्था आणि भारताची लोकसंख्या
  पुस्तक दुसरे : भारतातील शेती व उद्योग
  पुस्तक तिसरे : भारतीय कामगार, आर्थिक धोरणे आणि नियोजनाचे मूल्यमापन

- **सार्वजनिक वित्तव्यवहार (BAC 432)**
  पुस्तक पहिले : सार्वजनिक उत्पन्न
  पुस्तक दुसरे : सार्वजनिक खर्च
  पुस्तक तिसरे : राजकोषीय व्यवस्था व अर्थसंकल्पीय धोरण

- **आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र (BAC 433)**
  पुस्तक पहिले : आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत
  पुस्तक दुसरे : आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक धोरण
  पुस्तक तिसरे : आंतरराष्ट्रीय वित्त व व्यापारविषयक संस्था

- **कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत (BAC 434)**
  पुस्तक पहिले : कृषी क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत
  पुस्तक दुसरे : उद्योग क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत
  पुस्तक तिसरे : सेवा क्षेत्राचे आर्थिक सिद्धांत

- **ग्राहक संरक्षण (BAC 435)**
  पुस्तक पहिले : ग्राहक : संकल्पना व चळवळ
  पुस्तक दुसरे : ग्राहकांच्या समस्या व निराकरण
  पुस्तक तिसरे : ग्राहकांचे अर्थशास्त्र व खरेदीशास्त्र

- **ग्रामीण विकास (BAC 436)**
  पुस्तक पहिले : ग्रामीण भारताच्या समस्या
  पुस्तक दुसरे : ग्रामीण सरकारी संघटन आणि विकासासंबंधी सरकारी दृष्टिकोन
  पुस्तक तिसरे : ग्रामीण विकासासंबंधी बिनसरकारी, सेवाभावी संस्थांचा दृष्टिकोन

## (५) प्रगत इतिहास अध्ययन

- **प्राचीन भारत : प्रारंभ ते यादवकाळ (BAC 441)**
  पुस्तक पहिले : प्राचीन भारताची सांस्कृतिक ओळख (प्रारंभ ते ख्रिस्तपूर्व ६००)
  पुस्तक दुसरे : प्राचीन भारत : राजकीय स्थित्यंतरे
  पुस्तक तिसरे : प्राचीन भारत : आर्थिक व सामाजिक वाटचाल

■ **मध्ययुगीन भारत : (इ.स. १२०६ ते १८५७) (BAC 442)**

पुस्तक पहिले : सल्तनत ते विजयनगर (१२०६ ते १५२६)

पुस्तक दुसरे : मोगल – मराठा कालखंड (१५२६ ते १८१८)

पुस्तक तिसरे : वसाहतवादाचा पूर्वरंग

■ **भारतीय स्त्री–जीवनाची वाटचाल (BAC 443)**

पुस्तक पहिले : प्राचीन भारतीय स्त्री–जीवन

पुस्तक दुसरे : मध्ययुगीन भारतातील स्त्री–जीवन

पुस्तक तिसरे : आधुनिक भारतातील स्त्री–जीवन

■ **सार्क देशांचा इतिहास (BAC 444)**

पुस्तक पहिले : सार्क देशांचा परिचय

पुस्तक दुसरे : वसाहतवाद व सार्क देश

पुस्तक तिसरे : सार्क स्थापनेनंतरची वाटचाल

■ **विविधतेतील एकता (BAC 445)**

पुस्तक पहिले : भारताचा सांस्कृतिक वारसा आणि सामाजिक जडणघडण

पुस्तक दुसरे : भारतातील धार्मिक विविधता

पुस्तक तिसरे : सामाजिक पुनर्बांधणीची दिशा

■ **आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (BAC 446)**

पुस्तक पहिले : ब्रिटिश वसाहतवाद आणि महाराष्ट्र

पुस्तक दुसरे : महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधन

पुस्तक तिसरे : आंतरराष्ट्रीय आंदोलनातील महाराष्ट्राचा सहभाग

## (६) प्रगत राज्यशास्त्र अध्ययन

■ **राज्यशास्त्राचे स्वरूप (BAC 451)**

पुस्तक पहिले : व्यक्ती, समाज आणि राज्यसंस्था

पुस्तक दुसरे : राज्यसंस्थेविषयीच्या भूमिका आणि राजकीय व्यवहार

पुस्तक तिसरे : पायाभूत राजकीय संकल्पना

■ **राजकीय संरचना (BAC 452)**

पुस्तक पहिले : राज्यघटना व संघराज्यव्यवस्था

पुस्तक दुसरे : राजकीय पक्ष आणि निवडणूक व्यवस्था

पुस्तक तिसरे : विधिमंडळ, कार्यकारिणी आणि न्यायमंडळ

■ **आधुनिक भारतातील राजकीय वारसा (BAC 453)**

पुस्तक पहिले : भारतीय राजकीय विचारांची पार्श्वभूमी

पुस्तक दुसरे : स्वातंत्र्यपूर्वकालीन राजकीय विचारप्रवाह

पुस्तक तिसरे : स्वतंत्र भारतातील राजकीय विचारप्रवाह

■ **आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारण (BAC 454)**

पुस्तक पहिले : आंतरराष्ट्रीय राजकारण : सिद्धांत आणि स्वरूप

पुस्तक दुसरे : आंतरराष्ट्रीय राजकारणाचे मूलाधार

पुस्तक तिसरे : आंतरराष्ट्रीय संबंधाची वाटचाल

■ **पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह (BAC 455)**

पुस्तक पहिले : अभिजात राजकीय विचारप्रवाह

पुस्तक दुसरे : आधुनिक काळातील पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह – भाग १

पुस्तक तिसरे : आधुनिक काळातील पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह – भाग २

■ **लोकप्रशासन (BAC 456)**

पुस्तक पहिले : लोकप्रशासन : स्वरूप व व्याप्ती

पुस्तक दुसरे : प्रशासकीय यंत्रणा

पुस्तक तिसरे : स्थानिक प्रशासन : ग्रामीण व नागरी

## (७) प्रगत समाजशास्त्र अध्ययन

■ **पर्यावरण व समाज (BAC 461)**

पुस्तक पहिले : पर्यावरणविषयक विविध संकल्पना

पुस्तक दुसरे : जागतिक समस्या

पुस्तक तिसरे : स्थानिक समस्या

■ **ग्रामीण समाजशास्त्र (BAC 462)**

पुस्तक पहिले : ग्रामीण समाजशास्त्र : स्वरूप व व्याप्ती

पुस्तक दुसरे : जातिव्यवस्था व अर्थव्यवस्था

पुस्तक तिसरे : ग्रामीण राजकारण आणि ग्रामीण संस्कृती

■ **समाजशास्त्राचे अभिजात विचारवंत (BAC 463)**

पुस्तक पहिले : समाजशास्त्राचा उगम

पुस्तक दुसरे : कार्ल मार्क्स आणि मॅक्स वेबर

पुस्तक तिसरे : एमिल दुरखीम

■ **औद्योगिक समाजशास्त्र (BAC 464)**

पुस्तक पहिले : औद्योगिक समाजशास्त्र : स्वरूप व व्याप्ती

पुस्तक दुसरे : उद्योगधंदे, नोकरशाही, कामगार व व्यवस्थापन

पुस्तक तिसरे : औद्योगिक संबंध व कामगार कल्याण

■ **लोकसंख्या शिक्षण (BAC 465)**

पुस्तक पहिले : लोकसंख्या शिक्षण : ओळख

पुस्तक दुसरे : कुटुंबस्वास्थ्य शिक्षण

पुस्तक तिसरे : लोकसंख्या शिक्षण : मूल्यमापन संशोधन

■ **वयोवर्धन प्रक्रिया (BAC 466)**

पुस्तक पहिले : वयोवर्धन प्रक्रिया : स्वरूप व व्याप्ती

पुस्तक दुसरे : वृद्धांचे आरोग्य : शारीरिक व मानसिक

पुस्तक तिसरे : वृद्धापकाल समायोजन आणि ज्येष्ठोपयोगी संस्थांची भूमिका

## २.६.३ बी.ए. (ग्राहक सेवा) तृतीय वर्ष–प्रवेश पात्रता

खालीलपैकी कोणतीही एक पात्रता धारण करणारी व्यक्ती तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहकसेवा) साठी प्रवेशास पात्र असेल.

(अ) य.च.म.मुक्त विद्यापीठाचा द्वितीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) उत्तीर्ण, अनुत्तीर्ण किंवा अनुपस्थित विद्यार्थी.

किंवा

(ब) अन्य मान्यताप्राप्त विद्यापीठांमधून 'प्रथम आणि द्वितीय वर्ष बी.ए.' शिक्षणक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या तृतीय वर्षास प्रवेश मिळू शकेल. अशा थेट पद्धतीने तृतीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु.५३००/– (पाच हजार तीनशे मात्र) शुल्क असेल.

इतर विद्यापीठातून **बी.ए. व्यतिरिक्त** इतर शिक्षणक्रमाची दोन वर्षे उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) साठी प्रवेश मिळणार नाही. जे विद्यार्थी अन्य विद्यापीठातील प्रथम व द्वितीय वर्ष बी.ए. परीक्षा उत्तीर्ण होऊन तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्यांनी प्रथम आणि द्वितीय वर्ष बी.ए. परीक्षेच्या उत्तीर्णतेच्या गुणपत्रकाची प्रत्येकी एक–एक प्रमाणित सत्यप्रत (Attested True copy) जोडणे आवश्यक आहे.

अन्य विद्यापीठाच्या प्रथम व द्वितीय वर्ष बी.ए. परीक्षेमधील अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या तृतीय वर्षास प्रवेश मिळणार नाही.

## २.६.४ शिक्षणक्रम शुल्क

(अ) बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षानंतर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी :

बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या तृतीय वर्षाचे शुल्क रु.२३००/– (दोन हजार तीनशे मात्र) आहे. त्यापैकी विद्यापीठाचा हिस्सा रु. 1500/– असून तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच अभ्यासकेंद्र हिस्सा रु. 800/– असून अभ्यासकेंद्र हिश्श्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

(ब) अन्य विद्यापीठातून प्रथम वर्ष आणि द्वितीय बी.ए. उत्तीर्ण होऊन मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या तृतीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शुल्क रचना :

अन्य विद्यापीठातून प्रथम आणि द्वितीय वर्ष बी.ए. पूर्णपणे उत्तीर्ण करून मुक्त विद्यापीठाच्या बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या तृतीय वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु. ५३००/– (पाच हजार तीनशे मात्र) शुल्क आहे. त्यापैकी विद्यापीठाचा हिस्सा रु. 4500/– असून तो प्रवेश अर्ज भरतेवेळी ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. तसेच अभ्यासकेंद्र हिस्सा रु. 800/– असून अभ्यासकेंद्र हिश्श्याची रक्कम अभ्यासकेंद्राने ठरविलेल्या पद्धतीने अभ्यासकेंद्रावर जमा करावी व त्याची पावती घ्यावी. ऑनलाईन पद्धतीशिवाय अन्य कोणत्याही पद्धतीने विद्यापीठ हिश्श्याची रक्कम स्वीकारली जाणार नाही.

**महत्त्वाचे :**
**विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरून झाल्यानंतर त्याचा प्रिंटआऊट घ्यावा. सदर प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा करावा. अभ्यासकेंद्र हिस्सा (शुल्क) तसेच प्रवेश अर्जाचा प्रिंटआऊट अभ्यासकेंद्रावर जमा केल्यानंतरच विद्यार्थ्यास या शिक्षणक्रमाचे उपलब्ध असलेले अध्ययन साहित्य (पुस्तके) प्राप्त होऊ शकेल.**

# ३. कालावधी

बी.ए. (ग्राहक सेवा) हा पदवीस्तराचा शिक्षणक्रम तीन वर्षे कालावधीचा असला तरीही विद्यार्थी तो स्वत:च्या सोईने आठ वर्षापर्यंत पूर्ण करू शकतो.

आपली प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संपर्कसत्रासंदर्भात अभ्यासकेंद्र संयोजक/सहायक यांचेकडे चौकशी करावी.

आपण मुक्त विद्यापीठाची प्रथम वर्षाची अंतिम परीक्षा दिली, परंतु एकही अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करू शकला नाहीत (म्हणजे प्रत्येकी किमान ४०%) तरी आपणास द्वितीय वर्षास प्रवेश मिळू शकतो. मात्र, परीक्षा विभागाच्या नियमानुसार आपणास परीक्षा अर्ज भरून प्रथम वर्षाची परीक्षा पुन्हा देता येईल.

प्रवेश घेतलेल्या वर्षापासून जास्तीत जास्त आठ वर्षे कालावधीसाठी नोंदणी ग्राह्य असेल. त्या दरम्यान शिक्षणक्रम पूर्ण न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होतील. पुनर्नोंदणीची सुविधा नाही.

# ४. माध्यम

इंग्रजीच्या व हिंदीच्या अभ्यासक्रमाखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम असेल. इंग्रजी व हिंदीखेरीज इतर सर्व अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेतूनच असतील; मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी (भाषा विषय वगळता) मराठी अथवा इंग्रजी अथवा हिंदी भाषेचा वापर करता येईल.

## ५. श्रेयांक

सामान्यत: एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका' च्या परिमाणात केले जाते. साधारणपणे ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे एक श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन, पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन–चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे. प्रथम, द्वितीय तसेच तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) करिता प्रत्येक वर्षी ३६ श्रेयांक असतील. म्हणजेच संपूर्ण वर्षासाठी साधारणत: १०८० ते १२६० तासांचे कार्य अपेक्षित आहे. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमासाठी प्रत्येकी ३६ याप्रमाणे एकूण १०८ श्रेयांक आहेत.

## ६. मूल्यमापन प्रक्रिया

(अ) शैक्षणिक वर्ष २०१६–१७ मध्ये बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १०० गुण असलेल्या अभ्यासक्रमांसाठी (विषयांसाठी) ८० गुणांची लेखी परीक्षा तर २० गुण अंतर्गत मूल्यमापनाद्वारे (स्वाध्याय/गृहपाठ) असतील. त्याचप्रमाणे ५० गुण असलेल्या अभ्यासक्रमांसाठी (विषयांसाठी) ४० गुणांची लेखी परीक्षा तर १० गुण अंतर्गत मूल्यमापनाद्वारे (स्वाध्याय/गृहपाठ) असतील. उत्तीर्णता पातळी ४०% म्हणजेच लेखी परीक्षेत (विद्यापीठाच्या) ८० पैकी ३२ गुण अशी असेल.

वर्ष २०१६ पूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी मात्र पूर्वीची मूल्यमापन पद्धती (७० गुणांची लेखी परीक्षा आणि ३० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन) कायम असेल. वर्ष २०१६ मध्ये प्रवेशित तसेच त्यापूर्वीच्या विद्यार्थ्यांसाठी सर्व विषयांच्या प्रश्नपत्रिकेमधील प्रश्न प्रत्येकी ०५ गुणांचे असतील. द्वितीय वर्षातील 'पर्यावरण अभ्यास (EVS201)' या अभ्यासक्रमध्ये किमान 'सी' श्रेणीसह उत्तीर्ण होणे आवश्यक, तथापि या गुणांचा/श्रेणीचा अंतिम गुण/श्रेणीवर परिणाम होणार नाही.

(ब) प्रथम आणि द्वितीय वर्ष बी.ए. (ग्राहक सेवा) शिक्षणक्रमाच्या वार्षिक परीक्षेत विद्यार्थी काही अथवा सर्व अभ्यासक्रमांमध्ये अनुत्तीर्ण झाला तरी त्याला तृतीय वर्षास प्रवेश घेता येईल.

(ब) पदवीप्रदान द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या गुणांवर आधारित केले जाईल.

## ७. अभ्यासकेंद्रे

बी.ए. (ग्राहक सेवा) या शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता खालील अभ्यासकेंद्रे उपलब्ध आहेत.

| क्र. | अभ्यासकेंद्र | संकेतांक |
|---|---|---|
| ०१ | कै. छगनलाल मुळजीभाई कढी आर्टस कॉलेज अचलपूर कॅम्प परतवाडा, जि. अमरावती | 1205A |
| ०२ | कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, दूरदर्शन केंद्राजवळ, वामन नगर, मु.पो. खामगाव, जि. बुलढाणा | 1392A |
| ०३ | त्यागी सेवामंडळाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन, गांधी नगर, चर्चजवळ, यवतमाळ – ४४५००१ | 1473A |
| ०४ | नागेश सेवाभावी प्रतिष्ठान, गजानन महाराज मंगल कार्यालयाजवळ, शंकरनगर, पुसद, जि. यवतमाळ – ४४५२०४ | 1486A |
| ०५ | मातोश्री डॉ. कांचन शांतीलालजी देसरडा इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, डी.के.एम.एस. मेडिकल कॉलेज कॅम्पस, गुरू गणेश नगर, पहाडसिंगपुरा, औरंगाबाद | 21187 |
| ०६ | अभिनव कॉलेज ऑफ आय.टी.अँड मॅनेजमेंट, २५, छत्रपती कॉलनी, तहसीलदार कार्यालयाजवळ, जुना जालना, जि. जालना – ४३१ २१३ | 2351A |
| ०७. | नाशिक एज्युकेशन सोसायटीचे पेठे विद्यालय, रविवार कारंजा, नाशिक – ४२२ ००१ | 54204 |
| ०८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, मु.पो. मोराणे (नकाणे), जि. धुळे–४२४१०१ | 52135 |
| ०९ | श्री. वैष्णवी शिक्षण प्रसारक संस्थेचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, डी–२ विंग, तिसरा मजला, व्ही. व्ही. म्युन्सिपल (गोलाणी) मार्केट, जळगाव–४२५००१ | 5392A |
| १० | महाराष्ट्र विद्यार्थी सहायक मंडळ, ४८४, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे–४११०३० | 62333 |
| ११ | शांतिनिकेतन महाविद्यालय, लोकविद्यापीठ परिसर, माधव नगररोड, सांगली – ४१६ ३०९ | 7202A |
| १२ | संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर, जि. लातूर – ४१३ ५१३ | 8491A |
| १३ | रेनबो कॉम्प्युटर्स, शिवाजी नगर, हिंगोली – ४३१ ५१३ | 8801A |
| १४ | कै. सौ. शेषाबाई सीताराम मुंढे कला महाविद्यालय, माऊलीनगर, गंगाखेड, जि. परभणी – ४३१ ५१४ | 87103 |
| १५ | नारायणराव नागरे कला व वाणिज्य महाविद्यालय, दुसरबीड, ता. सिंदखेडराजा, जि. बुलडाणा | 1352A |
| १६ | एम.आय.टी. जनसंवाद महाविद्यालय, MIMSR मेडीकल कॉलेज कॅम्पस, अंबाजोगाई रोड, विश्वनाथपुरम, लातूर | 84113 |
| १७ | श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे रामकृष्ण बी.एड. कॉलेज, उत्तमनगर, अमरावती | 12128 |
| १८ | समर्थ महाविद्यालय अंतुले नगर, बायपास रोड, जि. हिंगोली | 8860A |

| क्र. | अभ्यासकेंद्र | संकेतांक |
|---|---|---|
| १९ | छात्रवीर राजे संभाजी प्रशासकीय सेवा महाविद्यालय<br>जगद्‌गुरू तुकोबाराय शैक्षणिक परिसर<br>चाडगाव रोड, मु. मोरवा, पो. ताडळी<br>ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०६ | 42107 |
| २० | श्री सरस्वती एज्युकेशन सोसायटीचे<br>गयादेवी जोशी आर्यभट्ट महाविद्यालय<br>सर्व्हे नं. ३९, प्लॉट नं. १७०,<br>केशवनगर, अकोला - ४४४ ००४ | 1177A |
| २१ | छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय<br>मु. पो. ता. किनवट,<br>जि. नांदेड | 85156 |

## ८. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती – ४४४ ६०४
(०७२१) २५३१४४५
फॅक्स : (०७२१) २५३१४४४

**(२) औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांचे वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी औरंगाबाद–४३१ ००२
(०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

**(३) मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी प्राथमिक शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक ग्रँट रोड (प.)
मुंबई – ४०० ००७
(०२२) २३८७४१८६, २३८२६१३५
फॅक्स : (०२२) २३८१३२५६

**(४) नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ
क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस, रविनगर चौक,
नागपूर – ४४० ००१
(०७१२) २५५३७२४/२५
फॅक्स: (०७१२)२५५३७२५

**(५) नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा
मजला नवीन पंडित कॉलनी,नाशिक –४२२ ००२
(०२५३) २३१७०६३
फॅक्स : (०२५३) २५७६७५६

**(६) पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका
शाळा क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ
हौदासमोर कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०
(०२०) २४४९११०७
फॅक्स : (०२०) २४४५७९१४

**(७) कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४
(०२३१)२६०७०२२ फॅक्स: २६०७०२३

**(८) नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
क्रीडा इमारत, नांदेड – ४२१ ६०६
(०२४६२) २२९९४०
फॅक्स : (०२४६२) २२९९५०, ९४२२२९२६७२

## ९. विशेष सूचना

### (अ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

(०१) प्रवेश मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रांचे वेळापत्रक अभ्यासकेंद्रावर जाऊन पाहावे.

(०२) विद्यापीठाशी आपण वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार, कागदपत्रे जपून ठेवावीत. विद्यापीठ आपणास कायम नोंदणी क्रमांक (PRN = Permanent Registration Number) देते. प्रत्येक वेळेस पत्रव्यवहार करताना, अभ्याससाहित्य घेताना, परीक्षा देताना PRN लिहिणे आवश्यक आहे. PRN अभ्यासकेंद्रावरून मिळवावा.

(०३) अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे.

(०४) विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणेच वर्गचाचणी आणि अंतिम परीक्षा घेण्यात येतात. या संबंधीचे सर्व अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

(०५) महिला विद्यार्थी विवाहित असल्यास पतीचे नाव लावताना नाव बदलण्याचा पुरावा प्रवेश–अर्जासोबत जोडावा. (गॅझेटमधील नोंद अथवा विवाह नोंदणी प्रमाणपत्राचा पुरावाच ग्राह्य धरला जाईल.)

(०६) अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

## (आ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगात्री परिसर', गंगापूर धरणाजवळ,
नाशिक – ४२२ २२२.
दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी ९.३० व सायंकाळी ५.०० वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ हे ठिकाण मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

**विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –**

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

## १०. संपर्कासाठी

१. **शैक्षणिक मार्गदर्शन**

**प्रा. डॉ. प्रमोद बियाणी**
प्राध्यापक व संचालक
शैक्षणिक सेवा विभाग
दूरध्वनी : (०२५३) २२३००१०, २२३००४७

**प्रा. डॉ. हेमंत राजगुरू**
सहयोगी प्राध्यापक
शैक्षणिक सेवा विभाग
दूरध्वनी : (०२५३) २२३००१०

२. **नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल :**
उपकुलसचिव
नोंदणी कक्ष–क्रमांक एक
दूरध्वनी : (०२५३) २२३०११८

३. **परीक्षा, परीक्षा–अर्ज, परीक्षा क्रमांक , निकाल, प्रमाणपत्र, इत्यादी.**
उपकुलसचिव
परीक्षा कक्ष, युनिट १
दूरध्वनी : (०२५३) २२३०७१६

४. **अध्ययन–साहित्य, पुस्तके इत्यादी :**
भांडार अधिकारी, भांडार व जावक कक्ष
भ्रमणध्वनी : ९४२२२५६३२८
दूरध्वनी : (०२५३) २२३०१०७

**सूचना :** शैक्षणिक सेवा विभागाकडून दिल्या जाणाऱ्या सूचना, आदेश, मार्गदर्शन, पूरक साहित्याची उपलब्धता यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला नियमित भेट देणे आवश्यक आहे. मोठ्या प्रमाणावरील विद्यार्थी संख्येमुळे विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधणे शक्य नसल्याने विद्यार्थ्यांनी पूरक साहित्याची उपलब्धता, वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचना, आदेश, मार्गदर्शन वा परिपत्रके यांसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाशी नियमित संपर्क ठेवून या सर्व बाबी प्राप्त करून घेणे ही विद्यार्थ्याची व्यक्तिगत जबाबदारी असेल. विद्यापीठाचे संकेतस्थळ (वेबसाईट) : *http://ycmou.digitaluniversity.ac*

**शैक्षणिक सेवा विभागाचा ईमेल:**
ycmou.asd@gmailcom

## शैक्षणिक सेवा विभागाचे (Academic Services Division) चे शिक्षणक्रम

**प्रमाणपत्र स्तर :** (१) संमंत्रक प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम
(२) मानवी हक्क प्रमाणपत्र शिक्षणक्रम

**पदविका स्तर :** (१) गांधी विचार दर्शन पदविका शिक्षणक्रम

**पदवी स्तर :** (१) बी.ए. (ग्राहक सेवा)

**पदव्युत्तर स्तर :** (१) एम.ए. विषय संप्रेषण
(२) एम.ए. शैक्षणिक संप्रेषण
(३) एम.ए. दूरशिक्षण
(४) एम.एस्सी. विषय संप्रेषण

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*

**निर्मिती**

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०१७, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

■ **प्रथम प्रकाशन** : जून २०१७
■ **अक्षरजुळणी** : ओम कॉम्प्युटर्स, नाशिक – ४२२ ००७
■ **प्रकाशक** : कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB17-18-24**